महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५१ वा | दिनांक : ०२/०८/२०२५ | वार शनिवार

# ४ हजार पाळीव हत्तींचे गेल्या २० वर्षात काय झाले? विश्वास पाटील





**कोल्हापूर** :कोल्हापूरच्या नांदणी मठातील माधुरी हत्तीणीला गुजरातच्या वनताराकडे सोपवण्यात आले. यावेळी हत्तीणीला निरोप देताना लहानांपासून मोठ्यांपर्यंत ग्रामस्थ भावूक झाले. तसेच याला विरोध देखील करण्यात आला. माधुरी हत्तीणीची वन विभागाकडून परवानगी न घेता मिरवणूक काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने देखील माधुरी हत्तीणीबाबतची याचिका फेटाळली व त्यानंतर माधुरीला वनताराकडे देण्याचा निर्णय देण्यात आला होता. याला अनेकांनी विरोध दर्शवला असून आता लेखक विश्वास पाटील यांनी देखील यावर आक्षेप घेत ट्विट केले आहे.

विश्वास पाटील म्हणाले, मौर्य काळापासून हत्ती जंगल सोडून माणसांच्या आणि विशेषत: मुलांच्या सहवासात आले. भारतीय सर्कशी, धार्मिक मठ आणि साधु संन्याशांनी आपल्या पोटाला चिमटे देऊन या ऐरावतांचे संगोपन केले होते.

पण स्वत:ला प्राणिमित्र समजणारे आणि आपल्या आईबापांना वृद्धाश्रमांचा रस्ता दाखवणारे काही महाभाग मानव आणि प्राणिमात्रांच्या युगानुयुगांच्या मैत्री आड आले. त्यातूनच कोर्टबाजीचा आधार घेऊन या हृदयशुन्य मंडळींनी प्राणी प्रेमाचा तमाशा मांडला. तो फारसा चांगला नाही.

१९९८ च्या दरम्यान भारतात मोठ्या ऐंशी सर्कशी होत्या. त्यामध्ये कमला नावाची केरळ मधील एक सर्कस ही तीन रिंगची होती. या एका सर्कशीत एका वेळी १०४ हत्ती होते. सर्कसवाले पोटाला चिमटा देऊन वाघ, सिंह आणि हत्तींचे सुद्धा संवर्धन व संगोपन करत. सांगा बरं, आमच्याकडच्या एका सर्कशीतील वरील फोटोतील हत्ती हे दुबळे किंवा तुमच्या कायद्याच्या भाषेत दुर्लक्ष केलेले आहेत का?

तेव्हा एखाद्या सर्कस कंपनीकडून काही वेळा प्राण्यांना इजा पोचली असेल. पण तशा एखाद दुसऱ्या घटनेचा फायदा घेऊन प्राणी संगोपनावर आणि संवर्धनावर कोर्ट हुकूमचा आधार घेऊन बंधने आणली गेली. रस्ते अपघातात सुद्धा दरवर्षी काही लाख माणसे मृत्यू पावतात. म्हणून काय उद्या हायवे बंद करणार आहात का?

मी माझ्या “द ग्रेट कांचना सर्कस” या नव्या कादंबरीच्या निमित्ताने या विषयाचा गेली दहा वर्षे अभ्यास करतो आहे. त्यातून मला हे जाणवले की, पाळीव प्राण्यांना जनमानसांपासून ह्याच प्राणी मित्रांनी दूर पळवले.

इसवी सन २००० च्या दरम्यान चार हजाराहून अधिक हत्ती कोर्टाच्या आदेशाचा आधार घेऊन ताब्यात घेतले गेले होते. त्यांना या प्राणी मित्रांनी स्वतः कधी एक बादलीभर पाणी सुद्धा कधी पाजले नाही. त्यांना फॉरेस्ट गार्डच्या ताब्यात दिले. त्यावेळी हे फॉरेस्ट गार्ड हत्ती, वाघासारख्या प्राणी संगोपनाचे तज्ज्ञ होते काय? ह्या साऱ्या दुर्दैवाचा परिणाम म्हणून भारतामध्ये काही हजार हत्ती, वाघ आणि सिंह सुद्धा सरकारी कस्टडीमध्ये मृत पावले आहेत. शिवाय मठामध्ये आणि सर्कशीमध्ये होणारे या प्राण्यांचे नवे जनन व संगोपन पूर्ण थांबले आहे.

या साऱ्या अवनीतीला कोण जबाबदार ? कायद्याच्या पळवाटा शोधणाऱ्या विद्वानांचे संघटित गट निर्माण होणे हा सुद्धा नव्या दादागिरीचा व व्हाईट कॉलर गुंडगिरीचा भाग आहे. या प्राणीमात्रांमुळे पन्नास-पन्नास किलोमीटरवर प्रवास करून सुद्धा आज साधा घोडा आमच्या मुलांना दाखवता येत नाही. हे लोक समाजाला घेऊन कुठे चालले आहेत याचा विचार होणे आवश्यक आहे.

या मंडळींची हिंमत असेल तर त्यांनी आजवर झालेल्या देशभरातील कोर्टाचे आदेश आणि त्यानुसार फॉरेस्टच्या ताब्यात दिलेले हे सर्व प्राणी आणि त्यांचे आज काय हाल झाले आहेत किंवा किती कमी कालावधीत ते बिचारे प्राणी तिकडे मृत पावले याची आकडेवारी जाहीर करावी .

हत्तीच्या बाबतीत बोलायचे तर हत्तीचे आयुष्य ६० ते ६५ वर्षे किमान असते. तर मग सांगा प्राणी मित्रांनो आणि मानवी शत्रूंनो या चार हजार हत्तींचे काय झाले ? इतर वेळी माहितीच्या अधिकाराचा टेंभा मिरवता तर त्या प्रत्येक प्राण्याची माहिती द्या बरं, अशी मागणी विश्वास पाटील यांनी केली आहे.

# आम्ही एक इंचही जमीन देणार नाही, ग्रामसभेत ठराव मंजूर : राजू शेट्टी



**कोल्हापूर** : शक्तिपीठ महामार्ग ज्या ज्या गावातून जात आहे, त्या गावातील ग्रामसभेत १५ ऑगस्ट रोजी शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, आमच्या गावातील एक इंच सुद्धा जमीन देणार नाही, असे ठराव आम्ही ग्रामसभेत करणार आहोत, असे माजी खासदार राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

राजू शेट्टी पुढे बोलताना म्हणाले की, शेतकऱ्यांच्या अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आम्ही या महामार्गाला विरोध करणार आहोत. आम्ही मोठ्या कष्टाने इथे फळबागा उभारल्या आहेत, त्यामुळे कोटी रुपये दिले तरी आम्ही आमच्या जमीन देणार नाही.

राजू शेट्टी म्हणाले की, सांगली जिल्ह्यातून जो शक्तिपीठ महामार्ग जात आहे अंजनी, मणेराजुरी, सावडी, माधवनगर, पदमाळे आणि कर्नाळा या भागात आज मोजणी सुरू करण्यात आली होती ती आम्ही बंद पाडली आहे. आम्ही शेतकऱ्यांनी ही मोजणी होऊ द्यायची नाही असा निर्णय घेतला आहे.

राजू शेट्टी म्हणाले की, सांगलीमधील हा सर्व परिसर बघितला तर तासगाव तालुक्यातील हा जो परिसर आहे तो द्राक्ष पट्टा आहे.त्यामध्ये एका पेक्षा एक द्राक्ष निर्यात करणारे शेतकरी आहेत. इथे ३५ ते ४० लाख रुपये एकर जमिनीची किंमत असताना कवडीमोल किमतीने या जमिनी घेण्याचा प्रयत्न होत आहे. पण कोटी रुपये दिले तरी आम्हाला आमच्या जमिनी द्यायच्या नाही.

राजू शेट्टी म्हणाले की, आम्ही २०-२५ किलोमीटर वरुन कर्ज काढून पाइपलाइन करत पाणी आणलेले आहे. त्याशिवाय एक एकर द्राक्ष पीक उभे करायला चार ते पाच लाख रुपये गुंतवणूक लागते.मग एका फटकऱ्यानेशी जर कुणी मंत्रालयात बसून आमच्या शेतात रस्ता काढणार असेल तर ते आम्हाला मान्य नाही. त्यामुळे शक्तिपीठ आम्ही कदापि होऊ देणार नाही, ही आम्हा सर्व शेतकऱ्याची भूमिका आहे. शक्तिपीठ महामार्ग हा अव्यवहारी असून रक्ताच्या शेवटच्या थेंब शरीरात असेपर्यंत रस्ता होऊ द्यायचा नाही हे शेतकऱ्यांनी ठरवले आहे.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २ ऑगस्ट २०२५

# अण्णाभाऊ साठे मराठी साहित्यविश्वातील खरे क्रांतिकारक - डॉ. एस. पी. खिल्लारे



**छत्रपती संभाजीनगर :** मराठी साहित्याला परंपरागत आवर्तनातून बाहेर काढत वैश्विक मराठी दर्जा देणारे लेखक म्हणून अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यविश्वातील खरेखुरे क्रांतिकारक होत , असे प्रतिपादन डॉ. एस. पी . खिल्लारे यांनी साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त "अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाज" या विषयावर बोलतांना डॉ. खिल्लारे यांनी अण्णाभाऊ यांच्या साहित्यातील आलेल्या आठरापगड जाती , भटके विमुक्त उपेक्षित हे कसे नायक व बाणेदार होते , सचोटी इमानदार, लढवय्ये होते , त्यांच्या लेखनातील नायिका गरीब , मजूर, कलावंत असूनही आपले चारित्र्य व सच्चेपणा त्यांनी कधीही गहाण ठेवला नाही म्हणूनच अण्णाभाऊ हे मराठी साहित्यातील खरेखुरे क्रांतिकारक ठरतातअसे स्पष्ट केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एन.एम करडे यांनी यांनी अध्यक्षीय समारोपात अण्णाभाऊंचे जीवन चरित्र व साहित्य यातील विविध पैलू उलगडून दाखविले, यावेळी डॉ. बी.एन शिंदे, डॉ. एस.पी. बुधवंत, डॉ. आर.व्ही.मस्के, डॉ. व्ही जी.पिंगळे, डॉ. प्रज्ञा रुईकर, डॉ. आर.बी. घोडे, डॉ. अशोक बारगजे, डॉ. प्रेमराज वाघमारे, डॉ. गणेश खिल्लारे, डॉ. विजय आडे, डॉ. सतीश वाघमारे, डॉ. संजय खरात, डॉ. पूजा वडमारे, डॉ. वैजनाथ सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती . कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा. नवनाथ गोरे यांनी तर आभार डॉ. गौतम घाडगे यांनी व्यक्त केले .

# अज्ञात वाहनाच्या धडकेत २१ वर्षीय युवकाचा मृत्यु



**दौलताबाद (जावेद अहमद) :** धुळे - सोलापूर महामार्गावर करोडी गावा जवळील उड्डाणपूल जवळ दि.३१ जुलै गुरुवारी रोजी रात्री १०:३०वाजेच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेत प्रतिक सतीष गोरे वय २१ वर्षे, राहणार कोरडगाव, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर. हल्ली मुक्काम सातारा परिसर खंडोबा मंदिर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर याचा जागिच मृत्यू झाला. त्याचे आसेकी प्रतिक गोरे व त्याचा मित्र नाव माहीत नाही हे दोघे दि . ३१ जुलै गुरुवार रोजी दुचाकी आर वन ५ क्र. MH 20 GS 4511 वर बसुन काही कामा निमित्त करोडी परिसरात आले होते रात्री १०:३० वाजेच्या सुमारास पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार करोडी गावाजवळील उडान पुला खालील रस्त्यावर अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली या धडकेत प्रतिक हा गंभिर जखमी झाला होता त्याच्या डोक्याला जबर मार लागला होता तर त्याचा मित्र हि जखमी झाला होता . डोक्याला गंभीर मार लागल्याने प्रतिक चा जागिच जागीच मृत्यू झाला होता. प्रतिक यास दौलताबाद पोलीस स्टेशन च्या पोलीस व्हान मधे पुढील तपासासाठी घाटी येथे नेण्यात आले होते तर प्रतिक चा मित्र यास रुग्ण वाहिकेन उपचारासाठी घाटी येथे दाखल करण्यात आले होते. प्रतिक च्या पश्चात आई,वडील,एक बहीण आहे.व घरात तो एकुलता एक मुलगा होता प्रतिक अविवाहित असुन शिक्षण घेत होता

# श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुलातील विद्यार्थिनींनी बनवल्या जवानांसाठी खास राख्या



**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते)** वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) वेरूळ येथील विद्यार्थिनींनी भारतीय सैन्यात सीमेवर दिवस-रात्र अविरत भारत मातेचे रक्षण करणाऱ्या सैन्य दलातील घरापासून दूर असलेल्या बांधवांसाठी राख्या बनवल्या. तसेच अनेक सुंदर ग्रीटिंग कार्ड बनवून जवानांसाठी रक्षाबंधनाचे शुभेच्छा संदेश स्वहस्ताक्षरात लिहून सोबत स्वतः राख्या तयार करून पाठवल्या. यासाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री अधाने गुरुजी यांनी वेरूळ गुरुकुलात शिक्षण घेतलेल्या तसेच सध्या सैन्य दलात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थी व "रक्षाबंधन" या पवित्र सणानिमित्त आपल्या घरी जाऊ न शकणाऱ्या जवानांशी संपर्क साधून पोस्टाद्वारे राख्या पोहोचतील याचे नियोजन करुन राख्या पाठविण्यात आल्या यात श्री शुभम मगर..(उत्तर प्रदेश) ,राहुल चव्हाण (पंजाब ),संतोष थोरात (संभाजीनगर) ,गणेश गायकवाड (श्रीनगर) ,योगेश मालोदे (पुणे) ,अविनाश गोरे (काश्मीर) ,समाधान शेलार (पंजाब) ,अनिल गोरे (प.बंगाल) ,हरिष चव्हाण (धुळे ),बाबू पवार (आसाम) ,पंढरीनाथ पायगव्हान (उधमपूर जम्मू काश्मीर ),वाघ अर्जुन (संभाजीनगर) ,वाल्मिक धुळे (उत्तर प्रदेश) ,शाम मगर (लडाख जम्मू काश्मीर) ,भिमराव मालोदे (राजस्थान) ,शंकर काळे ,(अंदमान निकोबार, नेव्ही ), निलेश माने ,मोहन कापसे, या सर्व माजी विद्यार्थ्यांना विद्यार्थिनींनी राख्या तयार करून पाठवल्या यासाठी प्रा.श्रीमती टिळेकर ताई व प्रा.श्रीमती सावंत ताई यांनी मार्गदर्शन केले. हा उपक्रम गेल्या ५ वर्षापासून चालू आहे..यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री दिनकर ढोबळे यांच्यासह श्री ज्ञानेश्वर क्षीरसागर, प्रा.श्री नागेश गुळवे प्रा.श्री योगेश रावते, प्रा.श्री निलेश भोसले, प्रा.श्री सुनील कोटकर प्रा.श्री भागवत भराडे यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# विहीरीत पडुन शेतमजूराचा मृत्यू



**दौलताबाद (जावेद अहमद) :** पोलीस स्टेशन हद्दीतील करोडी शिवरातील बाळु गोल्हार यांच्या गट नंबर 64 याच्या शेताती विहीरीत शेत मजुर प्रभाकर छगन चव्हाण वय 41 वर्षीय राहणार पाथ्री तालुका फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर. हल्ली मुकाम गट न 64 करोडी शिवाय ता.जि छत्रपती संभाजीनगर.याचा विहीरीत पडून मृत्यू झाला सदर घटना शुक्रवारी सकाळी आठ वाजता उघडकीस आली दौलताबाद पोलीसानी दिलेल्या माहितीनुसार दौलताबाद पोलीस स्टेशन हतित आसलेल्या करोडी शिवारातील गट न 64 बाळु गोल्हार याच्या शेतात प्रभाकर हे कुडूबा सोबत राहतात. दिनाक 31 जुलै गुरुवार सकाळ पासुन प्रभाकर हे घरात कोनाला काहि न सागता घरा बाहेर निघून गेला होते रात्री घरी परतले नाही म्हणून प्रभाकरची पत्नी व मूलाने परिसरात शोधा शोध केली परतु ते मिळुन आले नाही . रात्री उशिरापर्यंत शोधा शोध केली . दुसर्या दिवशी सकाळी शेतातील विहिर कडे शोधा शोध केली तेव्हा विहीरी जवळ शर्ट व चपल दिसुन आली . विहीत पडले आसावे या शंके मुळे कुटुबीनी सदर माहिती दौलताबाद पोलीस स्टेशन दिली माहीती मिळताच दौलताबाद पोलिस निरीक्षक रेखा लोढे याच्या मार्गदर्शन खाली पोलीस उपनिरीक्षक आयुब पठाण, खुशाल पाटील, लक्ष्मण गोरे, अशोक निमोने,सुदर्शन राजपुत आदी घटना स्थळी पोहचेले घटनास्थळी पहानी केली आसता विहीरी शेजारी शर्ट व चपल आढळुन आली विहीर खोल व पाणी जास्त असल्याने अग्निशमन दलाला बोलवण्यात आले. अग्निशमन दलाच्या विनायक निमकर, विनोद बमणे, मतीन शेख, रवी दुधे, सचिन फुले, लहु घुगे आदी नी तास भर शोध घेतला तेव्हा विहीत प्रभाकर याचे शव सापडले शव बाहेर काढुन पुढील तपासणी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात येथे पाठवण्यात आले .प्रभाकर चव्हाण याच्या पश्चात पत्नी, मुलगा,एक मुलगी आसा परिवार

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २ ऑगस्ट २०२५

## प्रतिभाताई पाटील प्राथमिक व वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर** : प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा, व वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालय मध्ये आज दिनांक 1 ऑगस्ट 2025 रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय मुख्याध्यापक श्री शैलेंद्र पाटील सर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले . मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ तडवी मॅडम यांनी आपल्या मनोगतुन अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनाबद्दल माहिती सांगितली.यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या विषयी माहिती सांगितली. संकल्प मगरे, प्रिया जयस्वाल, सिद्धी पोचलोरे, वैभव पानबिसरे, आयोध्या कांबळे ,अवनी बनकर ,मयुरी खरात, नरेंद्र घुगे या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून लोकमान्य टिळकांचे दहा गुण तसेच अण्णाभाऊ साठे यांचा समाजासाठी केलेला संघर्ष याविषयी आपले मत व्यक्त केले. त्यानंतर प्राथमिक विभागाचे जेष्ठ शिक्षक श्री प्रशांत कोलते सर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना या महापुरुषांविषयी माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात मा. श्री शैलेंद्र पाटील सर यांनी लोकमान्य टिळक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे प्रेरणादायी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ एस पी जाधव मॅडम यांनी केले . फलकलेखन श्री राजहंस सर यांनी केले. श्री वले सर, सौ गायकवाड मॅडम ,श्री बडक सर, श्री खाडे सर यांची उपस्थिती होती शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्रा व मा विद्यालय चिकलठाणा या शाळेत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्या आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.पी.पी शिंदे सर यांच्या उपस्थितीत तोंडपाठ भाषण स्पर्धा व 29 पर्यंत पाढे तोंडपाठ म्हणण्याची स्पर्धा आयोजितकरण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे वाटप करण्यात आली. या कार्यक्रमास श्री. राठोड सर, श्रीम.मालोदे मॅडम, श्रीम. अर्चना मॅडम, पठाण सर ,श्रीम. भिंगोले मॅडम, श्री. पठाण सर श्रीमंत. शिंदे मॅडम श्री. वाघ सर श्री राजपूत सर श्री. चव्हाण सर ,यांची प्रमुख उपस्थिती होती .

# मराठा आरक्षण सुनावणी शनिवार २ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयात होणार !



**मुंबई (प्रतिनिधी)** मराठा एसईबीसी आरक्षणाची महत्व पुर्ण सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात शनिवार दिनांक ०२ऑगस्ट २०२५ रोजी कोर्ट हॉल क्रमांक १३ येथे सकाळी १०.३० वाजता मा.न्यायमुर्ती रविंद्र घुगे,न्या. एन.जे.जमादार,न्यायमुर्ती संदीप मारणे यांचे स्थापन करण्यात आलेल्या विशेष न्यायालयात सकाळी १०.३० वाजे पासुन सुरू होणार असुन मागील सुनावणीत घटनादुरुस्ती शिवाय आरक्षण कसे देणार ? हा जेष्ठ विधीज्ञ गोपाल शंकरनारायण यांचा कायदेशीर व घटनात्मक पाठबळ असणार प्रश्न अनुत्तरित राहिला असुन वर्षानुवर्षे पुरोगामी राहिलेला मराठा समाज अचानक मागास कसा झाला? मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरक्षण कसे देणार ? असे एक ना अनेक प्रश्न या सुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात येऊन ५०टक्के पुढील स्वतंत्र १० टक्के आरक्षण घटना दुरुस्ती शिवाय कसे ? असा महत्वाचा प्रश्न आता निर्माण झाला असुन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष खंडपीठा पुढे मराठा आरक्षणाच्या अंतिम सुनावणीला सुरूवात झाली. आरक्षण कायद्यास आव्हान देणारे वरिष्ठ वकील अरविंद दातार व वरिष्ठ वकील गोपाळ शंकरनारायण, प्रदीप संचेती यांनी याचिका कर्त्यांच्या वतीने युक्ति वाद केला. सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा घालून दिलेली असतानाही मराठा समाजाला सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या मागास ठरवून महाराष्ट्र शासन ५०%आरक्षण मर्यादांचे सातत्याने उल्लंघन करत असुन महाराष्ट्र शासनाचा आरक्षण देण्याचा निर्णय घटनात्मक तरतुदींचा उल्लंघन ठरत आहे असा युक्तिवाद अरविंद दातार जेष्ठ विधीज्ञ शंकरनारायण यांनी केला होता. निवृत्त न्यायमूर्ती एम.जी. गायकवाड मागासवर्ग आयोगाने सर्वप्रथम,मराठा समाज सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असून हा समाज मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकला गेल्याचा अहवाल सादर करून या समाजाला सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थां मध्ये आरक्षणाची शिफारस केली ही अचानक बदलेली परिस्थिती न उलगडणारी आहे,असे ही अँडव्होकेट शंकरनारायण यांनी मराठा आरक्षणाला विरोध करताना न्यायालयात मागील सुनावणीत सांगितले होते. सुनावणीतील थोडा इतिहास मराठा आरक्षणा संदर्भातील अंतिम सुनावणीला मुंबई उच्च न्यायालयात सुरुवात झाली असुन १८ व१९जुलै च्या सुनावणीत मराठा समाज मागास नाही? हे सिद्ध करण्याकरता पुरावे सादर करण्याचे विरोधी याचिका कर्त्यांना निर्देश दिले होते. या विशेष न्यायालयात न्यायालयात याचिकाकर्ते भाऊसाहेब भुजंगराव पवार, अॅड.जयश्री लक्ष्मण पाटील, सीमा श्रीगोपाल मांधा,संजित राममिलन शुक्ला,प्रथमेश उदय ढोपले आणि इतर व्यक्तींनी महाराष्ट्र शासन व राज्य सचिव सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांचे विरोधात जनहित याचिका,याचिका दाखल केलेली असुन हस्तक्षेप याचिकाकर्ता म्हणुन मराठा समाजा च्या वतीने आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील हे मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता असुन त्यांचे वतीने अॅड श्रेयश संजीव देशपांडे व अॅड मधुर अनिल गोलेगावकर हे कामकाज पहात आहेत. दरम्यान, गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीच्या वेळी याचिका प्रलंबित असे पर्यंत शैक्षणिक प्रवेश आणि सरकारी नोकऱ्यां तील नियुक्त्यां बाबत उच्च न्यायालयाने अंतरिम दिलासा दिल्याची बाब निदर्शनास आणून दिली गेली नाही. परंतु,आधीच्या सुनावणी च्या वेळी दिलेला दिलासा हा २०२४- २५ या शैक्षणिक प्रवेशा पुरता कायम होता.यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे काय ? असा प्रश्न आरक्षणाला विरोध करणाऱ्यांनी उपस्थित करून सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती हे पूर्ण पीठाला सांगण्यात आले होते.तथापि, आधीच्या सुनावणीच्या वेळी अंतरिम दिलासा देण्या बाबत सविस्तर सुनावणी झाली होती.कोणीतरी नव्याने याचिका करते आणि अंतरिम दिलासा देण्याची मागणी करते हे सत्र सुरूच राहणार आणि मूळ प्रकरण अंतिमत: ऐकले जाणार नाही,असे राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी पूर्णपीठाला मागील सुनावणीत सांगितले होते.सर्वोच्च न्यायालयाला जर वाटलं तर ते नव्यानं निर्देश जारी करतील, असं स्पष्ट करण्यात आलं.त्यानंतर जेष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी आपल्या युक्तिवादास सुरूवात केली होती. त्यांचा प्राथमिक युक्तिवाद ऐकल्या नंतर यासंदर्भातील दोन अहवालात काय फरक आहे?, मराठा समाज मागास कसा नाही? हे आम्हाला पटवून द्या, अशी भूमिका उच्च न्यायालयानं घेतली होती. दरम्यान, या प्रकरणी पुढील सुनावणी २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २ ऑगस्ट २०२५

## माळीवाडा येथे लोकशाहीर डॉ.आण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उस्ताहात साजरी



**दौलताबाद (जावेद अहमद)** : माळीवाडा येथे लोकशाहीर डॉ.आण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उस्ताहात साजरी करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवारांच्या हस्ते सरपंच ज्योती मुळे,उपसरपंच मनेश गाजरे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळयला पुष्प हार घालुन पुजन करण्यात आले.यावेळी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या परिसरात विद्युत रोशनाई केली.रागोळी टाकून परीसर सजवला होता.आण्णा भाऊ साठे यांच्या जय घोशाने परिसर दुमदुमुन गेला. या प्रसंगी ग्रा.प.सदस्य नाना बर्डे,कमलबाई पोलिस पाटील प्रमोद साठे, नदकिशोर मुळे,बाळु साठे ताराबाई तुपे, शिवाजी आस्वार, गणेश अस्वार असाराम अस्वार, प्रदिप अस्वार, श्रीकांत खंडागळे, सतिश अस्वार, राजु अस्वार, गौरव ठोकळ,सुनिल बागूल, बंडू अस्वार, रामभाऊ आस्वार, किशोर आस्वार, अनिल आस्वार, सुखदेव खडागळे, नितेश मावस, कारभारी आस्वार, सुनिल बागूल नामदेव तुपे समाज बांधवाची महिलाची प्रमुख उपस्थिती होती.

## सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयात लोककवी अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



**पडेगाव (जावेद अहमद)** : सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय, मिटमिटा छत्रपती संभाजीनगर येथे आज लोककवी अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपन्न झाली झाली.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी बोलताना डॉ. मनोहर वानखेडे म्हणाले, लोककवी अण्णाभाऊ साठे हे एक समाज सुधारक लोककवी आणि लेखक होते. अण्णाभाऊ साठे हे दीड दिवस शाळेमध्ये गेले . दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील अण्णाभाऊंनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. या कार्यक्रमाचे संचलन आसित शेगावकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. दीपक पाईकराव यांनी केले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. शीलवंत गोपनारायण, प्रा. कुलदीप जाधव, डॉ. सुकेशनी जाधव, प्रा.रोहिणी देवकाते, अनिता काकरवल, श्रीकांत पातोडे, प्रा. रेणुका चव्हाण, आकाश साळवे, मोईन तडवी, इत्यादी महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांना अभिवादन




**जालना** : अण्णाभाऊ साठे यांनी दलित, उपेक्षित, स्त्रियांच्या वेदना आणि त्यांच्या वाट्याला आलेले जीवन आपल्या साहित्यातून मांडले. अण्णाभाऊ साठे यांनी वैयक्तिक जीवनात प्रचंड हालअपेष्टा सहन केल्या त्यांचे साहित्य जगभर पसरले रशियाने सुद्धा त्यांच्या साहित्याचे कौतुक केले. यावेळी त्यांनी लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाबद्दलही विचार व्यक्त केले असे प्रतिपादन प्रा. राजक्रांती वलसे यांनी केले.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. कविता प्राशर, संयोजक प्रा. संभाजी कांबळे यांच्याहस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंतरराष्ट्रीय जिम्नास्टिक्स महासंघाच्या पंच परीक्षेत प्रविण शिंदे उत्तीर्ण



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड)** : नुकत्याच दि २३ ते २६ जून गोवा येथे अंतरराष्ट्रीय जिम्नास्टिक्स महासंघाद्वारे घेण्यात आलेल्या अंतर राष्ट्रीय अक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स पंच परीक्षेत छत्रपती संभाजीनगर येथील प्रा प्रविण रावण शिंदे हे उत्तीर्ण झाले आहेत.२०२१ ते २०२४ या ऑलिम्पिक सायकलमधे ही त्यांनी यश संपादन केले होते.प्रतेक ऑलिम्पिक नंतर जिम्नॅस्टिक्स गुणप्रदान सहिंतेनूसार पंच परीक्षा घेण्यात येत असतात.प्रविण शिंदे हे दुसऱ्यांदा अंतरराष्ट्रीय अक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स पंच परीक्षेत उत्तीर्ण होणारे जिल्ह्याचे तसेच मराठवाड्यातील पहिले आणि एकमेव पंच आहेत. महाराष्ट्र जिम्नॅस्टिक्स असोसिएशन मधे ते अक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्सचे तांत्रिक समिती सदस्य म्हणून काम पाहतात.शिंदे हे पंच आणि प्रशिक्षक दोन्ही भूमिकेत छत्रपती संभाजीनगरचे नाव राष्ट्रीत-अंतरराष्ट्रीय स्तरावर गाजवत आहेत,पडेगाव येथे आपली के आर एस स्पोर्ट्स अकैडमी चालवतात त्यात अनेक राष्ट्रीय अंतर राष्ट्रीय खेळाडू त्यांनी घडवले आहेत.डॉ मकरंद जोशी यांच्या तालमीत तयार झालेले आणि जोशी यांना आदर्श मानणारे प्रविण शिंदे यांनी अनेक अंतर राष्ट्रीय स्पर्धेत पंच म्हणून काम पाहिले आहे आणि संपूर्ण भारतात अक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स मधे आपली ओळख निर्माण केली आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २ ऑगस्ट २०२५


# मराठी अस्मितेची हत्त्या करू नका - डॉ. सुधीर रा. देवरे



भाषा आणि नवीन शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्रानुसार १७ जून २०२५ ला मध्यरात्री महाराष्ट्र सरकारने एक सुधारीत जीआर प्रकाशित केला. आणि मराठी माणसांचा राग पाहून तो २९ जून २०२५ ला संध्याकाळी तात्पुरता मागं घेतल्याचं तोंडी सांगण्यात आलं, लेखी नव्हे. (मुळात केंद्राच्या शैक्षणिक धोरणाचं- त्रिभाषा सूत्र, NEP हे वय वर्ष ८ नंतर सुरू करायचं आहे, तेही सक्तीचं नसून त्या त्या राज्यानं ते ठरवायचं आहे. पहिलीपासून म्हणजे वय वर्ष ५ पासून हे सूत्र लागू होत नाही. वय वर्ष ८ पर्यंत मुलांना स्वत:च्या मातृभाषेतच शिक्षण द्यावं, असं त्यात नमूद आहे.) तरीही १७ जूनच्या नवीन जीआरनुसार महाराष्ट्र सरकारनं कोवळ्या मुलांवर सक्ती केली आणि २९ जूनला हा आदेश रद्द केला असं सांगत पुन्हा नव्यानं एक समिती नेमली. म्हणून हा प्रश्न अजून संपलेला नाही.

१७ जूनच्या सुधारीत (?) जीआरमध्ये 'हिंदी' वगळून इतर भाषांबाबत सरकार बरंच उदार झालेलं दिसतं. यात 'ऐवजीत' सरकार म्हणतं, '२० मुलांपेक्षा जास्त मुलं तिसरी भाषा म्हणून इतर कोणतीही भारतीय भाषा निवडू शकतात, म्हणजे त्या भाषेला नवीन शिक्षक देता येईल' वगैरे.

समजा माझ्या गावातील २० मुलांनी अहिराणी भाषा शिकायची असं ठरवलं. पण राज्यघटनेतील २२ अधिकृत भाषांपैकी अहिराणी नाही, ती बोलीभाषा आहे, म्हणून ती सरकारांतील तथाकथित तज्ज्ञांनुसार अभ्यासाला घेता येणार नसेल; तर तमिळ भाषा २० मुलं तिसरी भाषा अभ्यासाला घेत आहेत असं समजा. मग आता प्रश्न असा निर्माण होतो की, तिसऱ्या भाषेतील पहिलीसाठी हिंदी अभ्यासक्रमाची पुस्तकं आज जशी छापून तयार आहेत, तसं तमिळ भाषेतलं छापून तयार असलेलं पुस्तक सरकारनं दाखवावं. मूळ स्थानिक मराठी आणि लादलेल्या हिंदीची पुस्तकं सोडून भारतीय २० भाषांतील पहिलीच्या अभ्यासक्रमाची पुस्तकं महाराष्ट्र सरकारनं दाखवावी. अशी २० भाषेतील पुस्तकं छापून तयार नसतील तर अशा भाषा मुलांना कशा निवडता येतील? म्हणजे पर्याय आहे असं म्हणतानाच हिंदी सक्तीची झाली आहे. कारण अभ्यासक्रम नाही तर मुलांनी काय शिकायचं? त्यांची परीक्षा कोणत्या अभ्यासक्रमानुसार होणार? पहिली गोष्ट म्हणजे पहिलीतला मुलगा तिसरी भाषा स्वत: निवडू शकत नाही. तिसरी भाषा पालक ठरवेल. आणि पालक भाषा प्रेम न दाखवता मुलगा टक्केवारीत कसा झळकेल हा विचार करणार. म्हणून तिसऱ्या अमूक एका भाषेचा आग्रह पालक धरू शकत नाहीत, ते मुकाट्यानं हिंदी विषय नक्की करतील. एखाद्या विशिष्ट भाषेसाठी २० मुलांची संख्या कोणीतरी पुढाकार घेत जमवत राहण्यापेक्षा सरसकट हिंदी विषय बालकांवर आपोआप लादला जाईल. शेवटी पालकांपुढं प्रश्न मुलाच्या भावी आयुष्याचा असतो, कागदी गुणवत्तेचा असतो. या सर्व विवेचनाची गोळाबेरीज म्हणजे, तिसरी भाषा ही हिंदी भाषाच पहिलीपासून सक्तीची झाली आहे. खरं तर पहिली ते चौथी फक्त मातृभाषेतच शिक्षण द्यावं, दुसरी वा तिसरी भाषा नकोच, असं आमचं म्हणणं आहे. मुळात मराठी भाषाच मुलांना वर्गात नीट शिकवली जात नाही, ती नीट शिकवावी. मराठीतल्या शंभरांवर असलेल्या बोलीभाषांचा, आदिवासी भाषांचा टप्पाटप्प्यानं मुलांना आधी परिचय करून द्यावा. महाराष्ट्र सरकार शिक्षणतज्ज्ञ नाही, भाषातज्ज्ञ नाही. म्हणून असा लादलेला मनमानी निर्णय नवनवीन समित्यांचा खेळ न खेळता सरकारनं लोकांच्या आग्रहानुसार त्वरीत कायमचा रद्द करावा.

उत्तर भारतात या आधीच हिंदीसदृश्य वाटणाऱ्या अनेक भाषा जनगणनेत सरसकट हिंदी ठरवण्यात आल्या आहेत. अनेक भाषा, बोलीभाषा, लोकबोली, हिंदीनं या आधीच मारल्या आहेत. (उदा. ब्रज, छत्तीसगढी, बुंदेली, मैथिली, भोजपुरी, पहाडी, हरयाणवी, मारवाडी, राजस्थानी, डोगरी सारख्या अनेक भाषा हिंदीनं गिळल्या आहेत.) आता तिचा मोर्चा मराठीकडे वळला आहे. इथं एक थोडीशी दुरूस्ती करतो. खरं तर नैसर्गिक नियमानुसार कोणतीही भाषा दुसऱ्या भाषेला मारत नाही, पण एक भाषा बोलणारे लोक दुसऱ्या माणसांची भाषा ठरवून मारू शकतात. म्हणजे इथं हिंदी भाषेला दोष न देता तथाकथित हिंदीप्रेमी लोक आणि सर्वदूर एकाच भाषेत सपक प्रचार करून सत्तेला आधार देऊ शकेल अशी सपाट हिंदीभाषा इतर भाषकांवर लादण्याचे जे केविलवाणे प्रयत्न होताहेत, अशा लोकांच्या दुष्टीत हेतुबद्दल हे लिखाण आहे, भाषाव्देषाचं नाही.

स्थानिक लोकसंस्कृती आणि स्थानिक भाषा यांचं साहचर्य असतं. एकमेकांमध्ये त्यांचं अतूट प्रतिबिंब पडत असतं. पण परकी लोकसंस्कृती वा परकी भाषा आपण आपल्या परिवेशाविरूध्द बळजबरी ओढवून घेतली की कालांतरानं आपल्याच घरी आपण उपरे ठरत जातो. भारतातली सर्व संघराज्य प्रांतीय अस्मिता जपून आहेत, पण महाराष्ट्र त्याला अपवाद आहे. महाराष्ट्र नेहमी व्यापक 'राष्ट्रीय' हीत जोपासत आला. मात्र आता राष्ट्रीय हीत आणि विशिष्ट राजकीय पक्षीय हीत यातला फरक महाराष्ट्रातील सुज्ञ लोकांना कळत नाही की काय असं वाटू लागलं. राष्ट्रीय ऐवजी पक्षीय प्रेमात पडल्यामुळं मराठी अस्मितेची आत्महत्या होऊ नये, असंच कोणत्याही सुजाण नागरिकाला वाटेल. महाराष्ट्रात अशीच चुकीची धोरणं सुरु राहिली तर आपली तिसरी पिढी "ना घरकी ना घाटकी" होणार आहे, हे निश्चित. साहित्यिक, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत यांनी सामाजिक, राजकीय महत्वाच्या घटनांवर कायम परखडपणे व्यक्त व्हायलाच हवं. पण अनेक जण तोंडात गुळणी धरून बसतात. सध्या जे भाषेसंदर्भात- शिक्षणासंदर्भात अडाणीपणाचं धोरण सरकार राबवत आहे, यावर साहित्यिक कसा गप्प बसू शकतो? "मला काय त्याचं" असं म्हणत गप्प कसं बसता येईल? शासकीय समित्यांवर असलेले, विविध प्रकारची शासकीय पारितोषिकं पटकावणाऱ्या व्यक्ती या विषयावर व्यक्त का होत नाहीत? व्यक्त न होणंही एकवेळ आपण समजू शकतो. पण अशांपैकी काहींचं या निर्णयाचं समर्थन ऐकून- वाचून भयंकर आश्चर्य वाटतं! यदाकदाचित सरकारी बनावट समित्यांच्या अनुकूल अहवालानुसार पहिलीपासून त्रिभाषा लागू झाली, तर या भाषिक- शैक्षणिक धोरणाचे परिणाम आज लगेच दिसणार नाहीत, मात्र तिसऱ्या पिढीपासून याचे गंभीर परिणाम दिसू लागतील. (शिक्षणतज्ज्ञ व संपादक प्रा. रमेश पानसे यांच्या 'ग्राममंगल' संस्थेच्या १५ जुलै २०२५ च्या 'शिक्षणवेध' मासिकात प्रकाशित लेख. इतरत्र वापर करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)


**डॉ. सुधीर राजाराम देवरे**

ब्लॉगचा पत्ता :

http://sudhirdeore29.blogspot.com/


## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी यानिमित्ताने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी होते.कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर दोन्ही महान व्यक्तींच्या कार्यावर विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली.मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठेंच्या सामाजिक संघर्षाचे आणि टिळकांच्या राष्ट्रभक्तीचे महत्त्व सांगितले.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)

विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103

8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २ ऑगस्ट २०२५


# बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे 'भागवत आबा सर' सेवानिवृत्त



गोंदेगाव ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर या गावाच्या पंचक्रोशीत 'भागवत आबा' या नावाने सुपरिचित असलेले प्राध्यापक भागवत एकनाथ महालपुरे सर नुकतेच दि. ३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. विद्यार्थीप्रिय शिक्षक, प्रशासनप्रिय प्राध्यापक आणि व्यवस्थापनप्रिय माणूस, अशी त्यांची ओळख सर्वश्रुत आहे. 'पालकांमध्येही कमालीची लोकप्रियता असलेले व्यक्तिमत्व' 'माणसं जोड,णारा माणूस' हीसुद्धा एक महत्त्वाची ओळख! आबासाहेब भागवत महालपुरे सर म्हणजे गोंदेगाव पंचक्रोशीतील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील एक अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्व! अत्यंत हजरजबाबी आणि सुयोग्य निर्णयक्षमता असलेले, कोणत्याही शैक्षणिक व शालेय समसस्यांचे प्रभावीपणे निराकरण करण्याचे कौशल्य असलेले सर्वप्रिय असे आबा हे पंचक्रोशीतील सर्वांचे आवडते व्यक्तिमत्व! गोंदेगावच्या सरस्वती भुवन उच्च माध्यमिक विद्यालयात मानसशास्त्र विषयाचे अध्यापन करणारे भागवत महालपुरे सर मूळचे सातगाव डोंगरी इथले. इ.७ वी पर्यंतचे शिक्षण गावात झाल्यावर गोंदेगाव च्या सरस्वती भवन प्रशालेत त्यांनी इयत्ता आठवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण घेतले. याच काळात १५ जुलै १९८२ रोजी त्यांचे वडील समाजसेवक एकनाथराव आप्पांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. मात्र त्यांच्या आई प्रमिलानानींनी या दुःखावेगानंतरही मुलांचे शिक्षण सुरू ठेवले. पुढे भागवतआबा यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेऊन एम.ए.बी.एड. पूर्ण केले. वडिलांच्या पाऊलखुणा जपत भागवत आबांनी सामाजिक कार्य आपल्या गावापासून सुरू केले. माजी मंत्री के. एम. बापू पाटील यांच्या प्रभावान समाजकारणासाठी राजकारणात प्रवेश केला. गावात १९९४ मध्ये युवक काँग्रेस शाखा उघडून गावाचे प्रथम युवक अध्यक्ष झाले. त्याच वेळी इ. १२ वीच्या वासंतिक वर्गाची मानसशास्त्र विषय अध्यापनाची जबाबदारी सार्थ ठरवत ते विद्यार्थीप्रिय शिक्षक बनले. जून १९९४ पासून संस्थेने तासिका तत्वावर केलेली निवड सार्थ ठरवत मानसशास्त्र विषयाचा निकाल १०० टक्के लावण्यात यश मिळविले. १९९५ मध्ये ते गावच्या ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच झाले आणि त्याचवर्षी ते स.भु.मध्ये मानसशास्त्राचे कमवि. प्राध्यापक रिक्तपदी पूर्णवेळ अध्यापक म्हणून रुजू झाले. तेंव्हापासून आजपर्यंत १२ वी बोर्ड परीक्षेचा त्याच्या विषयाचा निकाल १०० टक्केच लागला आहे. शालेय कामकाजासोबतच क्रीडा स्पर्धा, शैक्षणिक सहली, विद्यार्थी संसद निवडणूक यासारख्या सहशालेय उपक्रमात सहभागी होत, पुढे येऊन जबाबदारी स्वीकारत उत्कृष्ट कामगिरी बजावत स्वतःचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांप्रमाणेच शाळेतील सहकारी बंधू - भगिनींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या कौटुंबिक सुख-दुःखात ते नेहमी जिव्हाळ्याने सहभागी होत सदैव सहकार्य करत आले आहेत. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव संस्थेतील सहकाऱ्यांसाठी पतसंस्था निवडणूक लढवत ती जिंकून १० वर्षे संचालक म्हणून कार्य करताना पतसंस्थेच्या आणि सभासदांच्या हिताचे निर्णय घेण्यात पुढाकार घेत सहकाऱ्यांची वाहवा मिळवली. गेली तीन दशके त्यांनी श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेत उत्कृष्ट सेवा दिली. एक उत्तम शिक्षक, चिकित्सक व्यक्ती, दिलखुलास अन् प्रभावी व्यक्तिमत्त्व लाभलेले कुशल समजशिक्षक, कार्यतत्पर-गुणग्राहक-कुशल संघटक, सदसर्वदा सहकार्यवृत्ती जपणारे सहकारी, सतत काहीतरी कामात मग्न असणारे, वेळ काढून समाजसेवेची आवड जपणारे समाजाभिमुख व्यक्तिमत्व असे त्यांचे थोडक्यात वर्णन करता येईल. शांत, संयमी, निगर्वी असलेल्या या बहुआयामी व्यक्तीचे नाव गोंदेगावच्या पंचक्रोशीत भागवत आबा, भागवत सर, आबासाहेब म्हणून आत्मभावाने घेतले जाते. सरस्वती भुवन प्रशाला गोंदेगाव ही त्यांची शाळा, सरस्वती भवन शिक्षण संस्था, त्यांचे गुरुवर्य - शिक्षणमहर्षी अण्णासाहेब के.टी. नानकर, कल्याणकर सर, माजी शाखाध्यक्ष डॉ. रघुनाथ इंगळे सर आणि स.भु. शिक्षण संस्थेप्रति असलेली त्यांची श्रद्धा आणि निष्ठा यांचे प्रतिबिंब त्यांच्या वागण्या-बोलण्यात नेहमीच दिसून आलेले आहे. माझा आणि आबांचा निकटचा संबंध आला तोआदरणीय अण्णासाहेब के. टी. नानकर सर यांच्या अमृतमहोत्सवी समारंभनिमित्त! त्यावेळी श्रद्धेय अण्णांबद्दल त्यांच्या मनात असलेला कृतज्ञताभाव प्रकर्षाने जाणवला. तो समारंभ आणि त्यानिमित्त निघालेला गौरवग्रंथ याचे बरेचसे श्रेय आबांना जाते. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी स. भु. पतसंस्थेच्या निवडणुकीपासून मला त्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळत राहीले. पतसंस्थेच्या निवडणुकीतील माझ्या यशात त्यांचा अतिशय मोलाचा वाटा आहे, हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो. नव्याने रुजू होणाऱ्या अथवा बदली होऊन आलेल्या शिक्षक बंधू भगिनींना ज्येष्ठ बंधूप्रमाणे योग्य सल्ला देणारे, शालेय प्रशासनाच्या, शाळेतील विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या अडचणी समजून घेत सहजपणे मार्ग काढणारे, सहकार्यासाठी सदैव तत्पर असणारे आबा सेवेच्या शेवटच्या दिवसापर्यंत शाळेत येऊन कार्यरत राहिले आणि यापुढेदेखील संस्थेच्याप्रति असलेला आत्मभाव, निष्ठा जपून वेळोवेळी शाळेला आवश्यक ते सहकार्य करण्याचे त्यांनी ठरविले आहे. नुकतीच काही दिवसांपूर्वी त्याची आखिल भारतीय वाणी समाज प्रबोधन संस्थेच्या जळगाव जिल्हाध्यक्ष पदी त्यांची निवड करण्यात आली आहे. आता निवृत्तीनंतर अधिक जोमाने अधिक वेळ देऊन कार्य करण्यासाठी शैक्षणिक सामाजिक राजकीय क्षेत्र त्यांना खुणावत आहे. समाजविकासासाठी त्याचा अधिकाधिक उत्तम पद्धतीने ते उपयोग करून घेतील, याची खात्री आहे. आदरणीय आबासाहेब भागवत महालपुरे सरांना सेवापूर्तीनिमित्त अनंत हार्दिक शुभेच्छा!


**डॉ. विनोद पांडुरंग सिनकर,**
साहित्यिक शिक्षक,
श्री. स. भु. प्रशाला, छत्रपती संभाजीनगर.


# दुसरबीड जि. प. सर्कल मधून संतोष दराडे मैदान गाजवणार



**बुलढाणा (महेश मुंढे) :** गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यामध्ये नेहमी अग्रेसर असणारे युवा नेते तथा सिंदखेडराजा तालुक्यात उभरते युवा नेतृत्व संतोष भाऊ दराडे हे येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सज्ज असून दुसरबीड जिल्हा परिषद सर्कल हे खुला प्रवर्गासाठी सुटल्यास संतोष दराडे निवडणूक लढवणार असून तशी तयारी त्यांनी गाठीभेटी घेण्याच्या माध्यमातून सुरू केली आहे, संतोष दराडे हे हिवरखेड पूर्णा येथील रहिवासी असून या अगोदर ते युवा स्वाभिमान पार्टीची तालुका अध्यक्ष होते अनेक शेतकरी कष्टकरी विद्यार्थी विधवा महिला यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले अनेक लोकांचे समस्या त्यांनी सोडवल्या, त्यानंतर वंचित बहुजन आघाडी मध्ये त्यांनी प्रवेश घेतला होता परंतु आपण दुसरबीड सर्कल मधून अपक्ष निवडणूक लढू असे त्यांनी स्पष्ट केले आहे, प्रत्येक सर्कलमधील गावचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करू प्रत्येक नागरिकांना पिण्याचे पाणी कसे देता येईल यासाठी प्रयत्न करू त्याचबरोबर प्रत्येक गावात आरोग्य सुविधा चांगल्या प्रकारे राबवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे यावेळी संतोष दराडे यांनी सांगितले त्यामुळे येणारे जिल्हा परिषद निवडणूक रंगत होण्याची चिन्हे आहेत.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903